कुर्ला, मुंबई येथील नेहरुनगर एस.टी. डेपो येथे ऑटोमोटीव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडीया, पुणे (ARAI, Pune) यांचेमार्फत वाहन निरीक्षण आणि परिक्षण केंद्र (Inspection and Certification Centre) स्थापन करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबत.(शुद्धीपत्रक)

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन शुद्धीपत्रक क्रमांकः एमव्हीडी-१०१८/प्र.क्र.२२०/परि-४,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १८ मार्च २०१९

वाचा :-

गृह विभाग, शासन निर्णय क्र.एमव्हीडी-१०१८/प्र.क्र.२२०/परि-४, दि.२२.०१.२०१९

शासन शुद्धीपत्रक :-

मुंबई मधील कुर्ला, नेहरुनगर येथील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या जागेवर ऑटोमोटीव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडीया,पुणे या संस्थेमार्फत वाहन निरीक्षण व परिक्षण केंद्र (Inspection and Certification Centre) स्थापन करण्यास रु.१४,००,००,०००/- (रुपये चौदा कोटी फक्त) इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास वाचा येथील दि.२२.०१.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे.सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्र.३

"यासाठी येणारा खर्च "मागणी क्र. बी-३, मुख्य लेखाशीर्ष-२०४१ वाहनांवरील कर ,(०१)(०६) वाहन चालविण्यासाठी चाचणी घेताना गुणात्मक वाढ करण्याकरीता पायाभूत सोयीमध्ये दर्जावाढ करणे, कृत्रीम चाचणी पथ बांधणे (कार्यक्रम) (२०४१ ०३२१) १३- कार्यालयीन खर्च" या लेखाशीर्षाखाली सन २०१८-२०१९ या आर्थीक वर्षाकरीता केलेल्या तरतुदींमधून भागविण्यात येईल."

या ऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावा.

"यासाठी येणारा खर्च "मागणी क्र. बी-३, मुख्य लेखाशीर्ष-२०४१ वाहनांवरील कर ,(०१)(०६) वाहन चालविण्यासाठी चाचणी घेताना गुणात्मक वाढ करण्याकरीता पायाभूत सोयीमध्ये दर्जावाढ करणे, कृत्रीम चाचणी पथ बांधणे (कार्यक्रम) (२०४१ ०३२१) १३- कार्यालयीन खर्च" या लेखाशीर्षाखाली सन २०१८-२०१९ या आर्थीक वर्षाकरीता केलेल्या तरतुदींमधून भागविण्यात येईल.त्यानुसार सदर लेखाशीर्षातील उपलब्ध असलेल्या निधीमधून रु.३,७५,००,०००/- (अक्षरी रुपये तीन कोटी पंचाहत्तर लक्ष फक्त) इतका निधी परिवहन आयुक्त कार्यालयाने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळास रोखीने उपलब्ध करुन द्यावा"

२. सदर शासन शुद्धीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१९०३१८१६४५२८३२२९ असा आहे. हे शासन शुद्धीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KADAM DATTATRAY HANMANT

Digitally signed by KADAM DATTATRAY HANMANT
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=cf316337e92d3c54da432222208093bfc6ed1d1570f094663515273d0b4d27fc, postalCode=400032, street=HOME DEP.MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=a923979cf886d5724fbed87cd57745c3f72eba57b0d277f11e970f0aaca99802, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=KADAM DATTATRAY HANMANT
Date: 2019.03.18 16:50:34 +05'30'

(द.ह. कदम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव
३. मा.राज्यमंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव
४. महालेखापाल (लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, १/२, मुंबई/नागपूर.
५. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. परिवहन उप आयुक्त (निरीक्षण/लेखा), परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई.
७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
९. उप सचिव (१४६१), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. सह सचिव (व्यय-८), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
११. कक्ष अधिकारी/अवर सचिव (बीयुडी-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. निवडनस्ती- (परि-४).